PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Vajwa re vajwa
Year: 1993

Song: Chala chala chala barshyala
Lyricist:

चला चला चला
बारश्याला चला
चला चला चला
बारश्याला चला
उषाताई निशाताई
हिना रिटा जाई जुई
चला चला चला चला
बारश्याला चला

चला या गं या सयांनो
पाळणा हा सजवू या
चला या गं या सयांनो
पाळणा हा सजवू या
गोड गोऱ्या सानुल्याला
तीट लावूनी गालाला
त्याची दृष्ट काढू या
चला या गं या सयांनो
पाळणा हा सजवू या
चला या गं या सयांनो
पाळणा हा सजवू या

हर्ष झाला गं
गोड चाळा गं
पाय इवलाले हलवितो
घुंगुर वाळा गं
ज्योत माहेरची दीप सासरचा
आज आपल्या हया घरटयाला
देई उजाळा गं
नाती गोती बहरून आली

सोनुकल्याच्या हसण्याची या गोडी चाखूया
चला या गं या सयांनो
पाळणा हा सजवू या
चला या गं या सयांनो
पाळणा हा सजवू या

हात हलवितो मला बोल्लावितो
झुल्लू लूल्लू या झोका दया झुलवा बाळाला
दोन हातांनी घ्या गं उचलूनी
या गं लाडानं गोंजारू
कुरवाळू त्याला
मारो डिकरो जान से प्यारो
मोट्ठा होऊन
खोटयांना चल धक्का देऊया
चला या गं या सयांनो
पाळणा हा सजवू या
आता फुगडया खेळूया
बाळ खेळतो गोड हसतो
गुलाबाच्या पाकळीत मध सांडतो
बाळाची आई गाते अंगाई
चांदण्यांशी कसा बघा खेळ खेळतो
झोका त्याला देऊया
फेर धरूनी नाचूया
सरसर गरगर फिरूया गं
जवळी त्याला घेऊया गं
बाळ मोठा गुणवंत
होईन जगती यशवंत
टिम टिम टिम झिम पोरी झिम
बाळाचं मुख जसं चांदवाचं बिंब

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*